Publication: Saamana
Date: 14/1/2020
Page: 10
Column: 8

सामना
मंगळवार,
दि. १४ जानेवारी २०२०

# ओव्हरहेड वायर्सजवळ पतंग उडवणे जिवघेणे

## अदानी इलेक्टिसिटीचा इशारा

मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी)- उच्च दाबाच्या (हायटेंशन) ओव्हरहेड वायर्सजवळ पतंग उडवणे जिवघेणे ठरू शकते, असा इशारा अदानी इलेक्ट्रिसिटीने मुंबईकरांना दिला आहे. ओव्हरहेड वायर्सजवळ पतंग उडवणे केवळ जिवघेणेच नव्हे, तर मालमत्तेचे नुकसान करणारे आणि पॉवरग्रीडला हानी पोहोचून संपूर्ण शहर काळोखात घालवणारे ठरू शकते याबद्दलही कंपनीने सावध केले आहे.

मकर संक्रांतीच्या दिवशी पतंग उडवण्याची परंपरा आहे. परंतु या पतंगासाठी वापरला जाणारा मांजा हा धातूची भुकटीयुक्त असतो. त्यामुळे त्या मांजाचा ओव्हरहेड वायर्सना स्पर्श झाल्यास त्यामुळे विजेचा झटका लागू शकतो. अदानी इलेक्ट्रिसिटीच्या ओव्हरहेड वायर्सचे जाळे वर्सोवा, ओशिवरा, गोरेगाव, मालाड, कांदिवली, बोरिवली भागात आहे. तिथे पतंग उडवल्याने काही दुर्घटना झाल्यास १९१२२ या हेल्पलाइनवर संपर्क साधावा, असे आवाहन कंपनीने केले आहे.